## आतील पानात वाचा

- 'आत्महत्या' हा उपाय नाहीच !
- भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी
- पानोली गावात युद्धस्मृतींचा ऐतिहासिक लोकार्पण सोहळा

दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक :०६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२० ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पुण्यात नसरापूरची पुनरावृत्ती! ९ वर्षीय मुलीवर अत्याचार, नंतर जीव घेऊन बॉडी फेकली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, पुणे :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. पिंपळवंडी गावात एका नऊ वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिचा गळा आवळून खून करण्यात आला. या धक्कादायक कृत्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, पोलिसांनी संशयित आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, काल मंगळवारी दुपारी साडेतीन ते चारच्या सुमारास ही घटना घडली. पीडित मुलगी अचानक बेपत्ता झाल्यानं तिच्या कुटुंबीयांनी शोध सुरू केला आणि पोलिसांत तक्रार दाखल केली. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, पीडितेच्या घराशेजारी राहणाऱ्या एका तरुणानं ओळखीचा गैरफायदा घेतला. त्यानेबालिकेला सायकलवरून जवळच असलेल्या उसाच्या शेतात नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करून तिचा गळा दाबून निर्घृणपणे जीव घेतला.

**आमदाराच्या गावातच धक्कादायक घटना...**

स्थानिक आमदाराचं गाव असलेल्या पिंपळवंडीत ही घटना घडल्यानं सर्वत्र खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पुणे जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन तपासाची सूत्रे हाती घेतली. स्थानिक तपास यंत्रणांच्या मदतीने पोलिसांनी संशयिताला तात्काळ ताब्यात घेतलं आहे. या अमानुष घटनेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थ व नातेवाईकांनी आरोपीला फाशी देण्याची मागणी केली आहे. तर हे प्रकरण फास्ट ट्रक न्यायालयात चालवून पीडितेला तातडीने न्याय देण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. जुन्नरचे आमदार शरद सोनवणेंच्या गावातच ही धक्कादायक घटना घडली असल्याची माहिती समोर आली आहे.



**गेटजवळ विवाहितेचा संशयास्पद मृत्यू**

कंपनीच्या कामानिमित्त मित्रासोबत वाडीवऱ्हे परिसरात गेलेल्या सिडकोतील ३४ वर्षीय महिलेचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. संबंधित महिला मित्रासोबत एका रिसॉर्टमध्ये जेवण केल्यानंतर बाहेर पडत असताना, तिच्या मित्राचे नियंत्रण सुटल्याने कार प्रवेशद्वाराला धडकली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने संबंधित महिलेचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, हा अपघात आहे, की घातपात याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

**मित्रासोबत रिसॉर्टवर जेवायला**

रुपाली नीलेश पाटील (वय ३४, रा. शिवनारायण अपार्टमेंट, एकदंतनगर, अंबड, नाशिक) असे मृत महिलेचे नाव आहे. रुपाली या सिडको परिसरातील एका डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कार्यरत होत्या. मंगळवारी कंपनीच्या कामानिमित्त त्या एका मित्रासोबत वाडीवऱ्हे परिसरात गेल्या होत्या. तेथून दोघे एका रिसॉर्टमध्ये जेवणासाठी गेले.

**नियंत्रण सुटून कार रिसॉर्टच्या प्रवेशद्वारावर धडकली**

जेवण झाल्यानंतर रिसॉर्टमधून बाहेर पडत असताना, तिच्या मित्राचे कारवरील नियंत्रण सुटले. कार रिसॉर्टच्या प्रवेशद्वाराला धडकली. यामुळे रुपाली पाटील या गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. ही घटना घडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

# पनवेलच्या रस्त्यावरील खाद्य टपऱ्यांवर स्वच्छतेचा बोजवारा!

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१९, पनवेल :** पनवेल शहरासह ग्रामीण भागातील विविध रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अधिकृत तसेच अनधिकृत खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या टपऱ्या आणि हातगाड्या उभ्या राहिल्या आहेत. नागरिकांना स्वस्त आणि सहज उपलब्ध खाद्यपदार्थ मिळत असले, तरी या विक्री केंद्रांवर अन्नसुरक्षा, स्वच्छता आणि आरोग्याच्या नियमांचे पालन कितपत केले जाते, हा गंभीर प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. विशेषतः अन्न व औषध प्रशासन या प्रकारच्या विक्रेत्यांची नियमित तपासणी करते का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अनेक खाद्यपदार्थ विक्रीच्या ठिकाणी स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. खाद्यपदार्थ उघडे ठेवलेले असतात, त्यावर माशा घोंघावताना दिसतात, तर काही ठिकाणी उंदीर फिरत असल्याचेही नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाणारे पाणी, भांडी, तेल आणि इतर साहित्य स्वच्छ व सुरक्षित आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी आवश्यक तपासणी होते का, याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**वापरलेल्या तेलाचा वारंवार वापर; आरोग्याचा प्रश्न गंभीर...**

तळलेले खाद्यपदार्थ तयार करताना तेलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. मात्र काही ठिकाणी वापरलेले तेल पुन्हा पुन्हा वापरले जात असल्याच्या तक्रारी आहेत. तेलाचा अशा पद्धतीने वारंवार वापर केल्यास खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे खाद्य विक्रेत्यांकडील खाद्यतेलाची गुणवत्ता, त्याचा वापर



आणि साठवणूक यांची तपासणी करण्याची गरज आहे.

**पनवेल रेल्वे स्थानकाबाहेरील परिस्थिती चिंताजनक**

पनवेल रेल्वे स्थानकाबाहेरील परिसरातही विविध खाद्यपदार्थांच्या टपऱ्या आणि हातगाड्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात. प्रवाशांची मोठी गर्दी असल्याने या ठिकाणी खाद्यपदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. मात्र या विक्री केंद्रांवरील स्वच्छता, खाद्यपदार्थांची हाताळणी, पाणी आणि तेलाचा वापर तसेच खाद्यपदार्थ झाकून ठेवण्याबाबत योग्य देखरेख आहे का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे अशा ठिकाणी समस्या निर्माण झाल्यास नागरिकांनी नेमकी तक्रार कोणाकडे करायची, याबाबतही संभ्रम आहे. पनवेल महानगरपालिका, सिडको, रेल्वे प्रशासन की अन्न व औषध प्रशासनजबाबदार प्राधिकरण कोणते, याची स्पष्ट माहिती सामान्य नागरिकांना सहज उपलब्ध नसल्याची भावना आहे.

**तक्रारीनंतर कारवाईला विलंब का?**

नागरिकांकडून तक्रारी करण्यात आल्यानंतरही संबंधित यंत्रणांकडून तातडीने कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. जर खाद्यपदार्थ विक्रीच्या ठिकाणी स्वच्छता आणि अन्नसुरक्षेचे नियम पाळले जात नसतील, तर संबंधित विभागांनी नियमित तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळेच काही विक्रेत्यांकडून नियमांकडे दुर्लक्ष करण्याचे प्रकार वाढत आहेत का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ एखादी घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी नियमित तपासणी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे.

**व्यवसायाचा अधिकार आहे; मात्र नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा नाही**

प्रत्येकाला कायदेशीर चौकटीत व्यवसाय करण्याचा अधिकार आहे. मात्र नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने खाद्यपदार्थांची विक्री करण्याचा अधिकार कोणालाही नाही. त्यामुळे अधिकृत तसेच अनधिकृत खाद्य विक्रेत्यांची तपासणी, परवाने, स्वच्छता व्यवस्था, खाद्यपदार्थांची हाताळणी, वापरलेले तेल आणि अन्नसुरक्षा नियमांचे पालन याबाबत संबंधित प्रशासनाने व्यापक मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

FDA आणि संबंधित स्थानिक प्रशासनाने पनवेल शहर व ग्रामीण भागातील रस्त्यावरील खाद्य विक्रेत्यांची प्रत्यक्ष पाहणी करून अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई कधी करणार? हा प्रश्न आता नागरिकांकडून थेट विचारला जात आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा विषय केवळ खाद्य विक्रेत्यांचा किंवा प्रशासनाचा नसून सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याऐवजी समन्वयाने तपासणी करून ठोस कारवाई करणे आवश्यक आहे.

## खंडेराव महाराज मंदिराजवळील पालखेड कालव्याचा पूल धोकादायक

## कायमस्वरूपी आरसीसी पूल उभारण्याची मागणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१९, विंचूर (नाशिक) :** येथील श्री खंडेराव महाराज मंदिराजवळील पालखेड डाव्या कालव्यावरील पुलाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, भविष्यातील संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी या ठिकाणी तातडीने कायमस्वरूपी मजबूत आरसीसी पूल बांधण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश दगुजी चव्हाण यांनी केली आहे. याबाबत त्यांनी विंचूर ग्रामपंचायत प्रशासनाला लेखी निवेदन सादर केले आहे.

**दळणवळणाचा महत्त्वाचा मार्ग**

पालखेड डावा कालवा हा विंचूर व परिसरातील शेतीसाठी जीवनवाहिनी ठरला असून, कालव्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती विकसित झाली आहे. श्री खंडेराव महाराज मंदिराजवळील हा पूल विंचूर–सुभाषनगर–सोनेवाडी तसेच विंचूर–थेटाळा या प्रमुख रस्त्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. या मार्गावरून दररोज शेतकरी, कामगार, शालेय विद्यार्थी तसेच मालवाहतूक वाहनांची मोठी वर्दळ असते.

**अनेक वस्त्यांचा संपर्क अवलंबून**

या पुलाचा वापर प्रामुख्याने पुढील परिसरातील नागरिक करतात:

थेटाळा, सुभाषनगर, सोनेवाडी व विठ्ठलवाडी

किसनवाडी, दरेकर वस्ती, गोरे वस्ती व जेऊघाले वस्ती

नेवगे वस्ती, संधान वस्ती, गलांडे वस्ती, शेलार वस्ती व जाधव वस्ती

**संरक्षण कठडे नसल्याने जीवितास धोका**

पुलाची संरचनात्मक अवस्था अत्यंत खराब झाली असून संरक्षण भिंतींची उंची अतिशय कमी आहे. अनेक ठिकाणी लोखंडी जाळ्या अथवा कठडे नसल्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा गर्दीच्या प्रसंगी वाहन कालव्यात कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

तसेच, श्री खंडेराव महाराज आणि श्री शनैश्वर महाराज यांच्या वार्षिक यात्रेसह धार्मिक उत्सवांच्या काळात येथे भाविकांची प्रचंड गर्दी उसळते. वाढती वाहतूक व लोकसंख्येचा ताण लक्षात घेऊन प्रशासनाने या पुलाची तत्काळ तांत्रिक तपासणी करावी आणि युद्धपातळीवर नवीन आरसीसी पुलाचे काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# चंद्रपूरच्या विकासकामांना गती देण्यासाठी आ. किशोर जोरगेवार यांची जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण विकासकामांना गती देण्यासोबतच प्रलंबित प्रश्नांचा प्रभावीपणे निपटारा करण्यासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात आढावा बैठक घेतली. शहर आणि ग्रामीण भागातील सुरू, मंजूर तसेच प्रस्तावित विकासकामांची अद्ययावत माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. चंद्रपूरच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यासाठी प्रशासनासोबत सातत्याने समन्वय ठेवून काम केले जात असल्याचे यावेळी आ. जोरगेवार यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी विशाल मेश्राम, शिक्षणाधिकारी सोनवणे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले, मनपा उपायुक्त संदीप चिद्रावार, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता अक्षय पगारे, विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता पूनम वर्मा, मनपा शहर अभियंता रवींद्र हजारे, महावितरणचे कार्यकारी अभियंता दार्वेकर, उपअभियंता खेळकर, वनपरिक्षेत्र अधिकारी नायगमकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुनील राठोड यांच्यासह शिक्षण संस्थेचे संस्थाध्यक्ष अशोक जीवतोडे, सूर्यकांत खनके, विकास, महाथेरो डॉ. सुमनवन्नो, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, तुषार सोम, बलराम डोडाणी, नामदेव डाहुले, नगरसेवक भालचंद्र दानव, रॉबिन बिश्वास, जितेश कुळमेथे, आशा देशमुख, नितेश गवळी आदी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला शहराच्या भविष्यातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या चंद्रपूर रिंग रोडच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि वाढती वाहतूक लक्षात घेता रिंग रोड प्रकल्पाला गती मिळणे आवश्यक असल्याचे आ. जोरगेवार यांनी स्पष्ट केले. यासोबतच प्रियदर्शिनी चौक ते मध्यवर्ती बसस्थानक रेल्वे पुलाचे रुंदीकरण तसेच नवीन पुलाच्या बांधकामाबाबतही संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

मतदारसंघातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रस्ते विकासकामांवरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. सुरू असलेली, मंजूर झालेली तसेच पूर्णत्वास आलेली रस्त्यांची कामे कोणत्या टप्प्यावर आहेत, त्यातील अडचणी कोणत्या आहेत आणि प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, याची माहिती आ. जोरगेवार यांनी घेतली. विकासकामांमध्ये अनावश्यक विलंब होऊ नये आणि नागरिकांना त्याचा वेळेत लाभ मिळावा, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



यावेळी नझूल जमिनींच्या पट्टे वाटपाचा तसेच प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. अनेक नागरिकांची प्रकरणे विविध कारणांमुळे प्रलंबित असून, त्यांचा नियमानुसार जलदगतीने निपटारा करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी भूमिका आ. जोरगेवार यांनी मांडली. यासोबतच शहरातील महत्त्वपूर्ण मंदिरांना सुधारित दर्जा देण्याच्या प्रस्तावाचाही आढावा घेण्यात आला.

चंद्रपूरच्या पर्यटन विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने प्रस्तावित विपश्यना केंद्र तसेच बंद पडलेल्या खाणींच्या ठिकाणी 'माईन टुरिझम' आणि इको-पार्क विकसित करण्याच्या प्रस्तावावरही बैठकीत चर्चा झाली. चंद्रपूरला औद्योगिक शहरासोबतच पर्यटनाच्या दृष्टीनेही सक्षम ओळख निर्माण करून देण्यासाठी उपलब्ध ऐतिहासिक, नैसर्गिक आणि औद्योगिक वारशाचा योग्य पद्धतीने वापर करणे आवश्यक असल्याचे आ. जोरगेवार यांनी सांगितले.

शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा ठरणारे विद्युत खांब नागरिकांसाठी अडचणीचे ठरत असल्याने, त्यांचे स्थलांतर करण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि रस्त्यांचा प्रभावी वापर करता यावा, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी विद्युत खांबांचे स्थलांतर तातडीने करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय रयतवारी कॉलरी ते महाकाली कॉलरी परिसरातील रस्ता रुंदीकरण, तसेच चंद्रपूर बसस्थानक–रेल्वे स्टेशन–महाकाली कॉलरी–चांदाफोर्ट रेल्वे स्टेशन या ३.१० किलोमीटर मार्गाचे रुंदीकरण, मजबुतीकरण व सुधारणा या महत्त्वपूर्ण कामांचाही आढावा घेण्यात आला. या मार्गावरील वाहतुकीची वाढती गरज लक्षात घेता कामांना आवश्यक ती गती देण्याबाबत संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले.

शैक्षणिक संस्थांवरील मालमत्ता कर आणि संलग्न करमाफीच्या विषयावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. शैक्षणिक संस्थांवरील कराचा प्रश्न, त्याचा विद्यार्थ्यांवर आणि संस्थांच्या कामकाजावर होणारा परिणाम याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत चर्चा झाली.




## सणांचा, व्रतवैकल्यांचा आणि चैतन्याचा महिना

श्रावण महिना सुरू झाला की वातावरणातच एक वेगळे चैतन्य निर्माण होते. हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा महिना केवळ धार्मिक श्रद्धेचा नाही, तर निसर्ग, परंपरा, कुटुंब आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम घडवून आणणारा महिना आहे. त्यामुळेच श्रावणाला 'सणांचा महिना' आणि 'व्रतवैकल्यांचा महिना' असे म्हटले जाते.

श्रावणातील सोमवार विशेष पवित्र मानला जातो. या दिवशी भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा केली जाते. अनेक भाविक उपवास, अभिषेक आणि विविध धार्मिक विधी करतात. श्रावणातील प्रत्येक दिवसाचेही धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. मंगळागौर, नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, बैलपोळा अशा विविध सण-उत्सवांनी हा महिना अक्षरशः बहरून जातो. त्यानंतर येणाऱ्या गौरी-गणपतीच्या उत्सवाची चाहूलही श्रावणापासूनच लागते.

नागपंचमीपासून दसरा-दिवाळीपर्यंतच्या सणांची जणू सुरुवातच श्रावणातून होते. त्यामुळे घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत, नातेवाईकांच्या भेटीगाठी, पूजा-अर्चा आणि पारंपरिक कार्यक्रम यामुळे घरातील वातावरण आनंदाने भरून जाते. श्रावणातील प्रत्येक दिवस जणू उत्सवाचा अनुभव देतो.

श्रावणातील व्रतवैकल्यांमागे केवळ धार्मिक श्रद्धा नाही, तर मानसिक शिस्त, संयम आणि सकारात्मकतेचा संदेशही आहे. जीवनात सुख-दुःखाचे अनेक प्रसंग येत असतात. अशा वेळी श्रद्धा आणि आत्मविश्वास मनाला आधार देतात. सणांच्या निमित्ताने कुटुंबीय, मैत्रिणी आणि नातेवाईक एकत्र येतात. मनमोकळ्या गप्पा, हसणे-खेळणे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, यामुळे नात्यांमध्येही आपलेपणा वाढतो. विशेषतः मंगळागौरसारख्या परंपरांमधून महिलांना एकत्र येण्याची, आनंद व्यक्त करण्याची आणि सामाजिक बंध दृढ करण्याची संधी मिळते.

श्रावणाचे वैशिष्ट्य केवळ धार्मिक परंपरांपुरते मर्यादित नाही. या महिन्यात निसर्गही नव्या रूपात बहरलेला असतो. आषाढातील पावसाने धरती हिरवाईने नटलेली असते. डोंगर-दऱ्या, शेतांची बांधं, झाडं-वेली आणि माळरानावर हिरवाईची चादर पसरलेली दिसते. श्रावणाच्या रिमझिम सरी आणि क्षणाक्षणाला बदलणारे ऊन-पावसाचे वातावरण मनाला प्रसन्न करून जाते.

म्हणूनच बालकवींच्या 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे' या ओळी श्रावणाचे यथार्थ चित्र उभे करतात. क्षणात पाऊस, क्षणात ऊन आणि पुन्हा हिरवाईवर बरसणाऱ्या सरीया साऱ्या निसर्गाच्या लीलांनी श्रावण अधिकच मोहक बनतो. 'हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण' असे त्याचे वर्णन करावेसे वाटते.

श्रावण हा विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना जोडणारा काळही आहे. भारतातील विविध समाजघटकांचे सण आणि उत्सव अनेकदा या कालखंडात किंवा त्याच्या आसपास येतात. त्यामुळे परंपरांचा सन्मान राखत परस्परांच्या सणांमध्ये आनंदाने सहभागी होणे, बंधुभाव वाढविणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही आपल्या संस्कृतीची खरी ताकद आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस तंत्रज्ञानाच्या अधिक जवळ आणि निसर्गापासून दूर जात आहे. नात्यांमध्येही प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे. अशा परिस्थितीत श्रावणासारखे सण आपल्याला निसर्गाशी, परंपरांशी आणि माणसामाणसांशी पुन्हा जोडतात. सण साजरे करताना पर्यावरणाची काळजी घेणे, अंधश्रद्धा टाळणे, अनावश्यक खर्चाला आळा घालणे आणि सर्वांना सोबत घेऊन आनंद साजरा करणे ही काळाची गरज आहे.

श्रावण म्हणजे भक्ती, पण केवळ कर्मकांड नव्हे; श्रावण म्हणजे निसर्ग, पण केवळ हिरवाई नव्हे; श्रावण म्हणजे सण, पण केवळ गोडाधोडा नव्हे. श्रावण म्हणजे मनाला प्रसन्न करणारे चैतन्य, नात्यांना घट्ट करणारा स्नेह आणि जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा!

निसर्गाच्या सान्निध्यात, परंपरांच्या सुगंधात आणि सणांच्या आनंदात मन चिंब भिजविणारा हा श्रावण प्रत्येकाच्या जीवनात सुख, समाधान, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा!

**- श्याम ठाणेदार**




देश एकीकडे प्रगतिपथावर मार्गक्रमण करत असताना काही समस्या मात्र दिवसागणिक गंभीर स्वरूप धरण करत आहेत. देशातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण ही त्यातीलच एक अतिशय गंभीर समस्या आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या देशाच्या स्वातंत्र्यदिनी नागपूर पोलीस आयुक्तालयातील अर्ज शाखेत कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर झोल यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी आत्महत्या केली तर नुकतीच पुरणमल मेहेरा या ३० वर्षीय नौदल खलाशाने आपली पत्नी आणि दोन मुलांना संपवून स्वतः आत्महत्या केली. २०२० सालात देशभरात १ लक्ष ५३ हजार ५२ जणांनी आत्महत्या केली तर २०२४ साली हीच संख्या १ लक्ष ७० हजार ७४६ पर्यंत पोहोचली. जानेवारी ते जून २०२६ या पहिल्या ६ महिन्यांत मराठवाड्यात ४६५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.


यात सर्वाधिक १०९ केसेस एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नोंदवल्या गेल्या. यवतमाळ जिल्ह्यात जानेवारी ते मे २०२६ दरम्यान १०२ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. महाराष्ट्रातील एकूण आत्महत्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण ७५ ते ८० टक्के आहे. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये १८ ते ४५ या वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण सर्वाधिक ६५% पेक्षा जास्त आहे. एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे.

आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. ऐन उमेदीच्या काळात आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात.

मात्र आज हा टोकाचा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यामागे कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत याचाही विचार आत्महत्या करणाऱ्याने करायला नको का ? परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा परीक्षेत कॉपी करताना पकडले यांसारख्या क्षुल्लक कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्या करतात. पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, आपल्यामुळे आपल्या पालकांना खाली मान घालावी लागेल या विचाराने विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवतात; मात्र आपल्या अशा जाण्याने पालकांना आयुष्यभराचे दुःख आपण देऊन जात आहोत याचा विचार हे विद्यार्थी केव्हा करणार ? मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर स्वप्न पाहिलेली असतात, क्षणात या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होतो. प्रेमात अपयश आल्याने ऐन तारुण्यात तरुण तरुणी आत्महत्येचा निर्णय घेतात; मात्र हे करताना त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी आजतागायत किती काय केले आहे याचा विचार ते केव्हा करणार. अपेक्षित जोडीदार मिळणे हेच जीवनाचे ध्येय असते का ? आपल्याला लहानाचे मोठे करण्यात आपल्या पालकांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी आपल्याला लावलेली निरपेक्ष माया अशी क्षणात संपवून टाकायची असते का ? नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळते, इतरांची प्रगती होते मात्र आपल्याला डावलले जाते, वरिष्ठ अधिकारी आपल्याशी तुच्छतेने बोलतात, आपल्यावर कामाचा ताण टाकतात ही कारणे जीवनयात्रा संपवण्यासाठी कारणीभूत कशी काय असू शकतात. प्रयत्न केल्यावर, इतरांची मदत घेतल्यावर या सर्वांवर उपाय खरंच सापडणार नाहीत का ? शेवटी प्रत्येकाचे नशीब हे वेगवेगळेच असते.

व्यवसायात कर्जबाजारी झाल्याने काही जण टोकाचा निर्णय घेतात; मात्र आपल्या आत्महत्या करण्यामुळे कर्जाची परतफेड होणार आहे का ? आत्महत्या केल्याने तुमची मुक्तता होईल मात्र तुमच्या घरच्यांनी काय अपराध केला आहे ? काहीजण याही पुढे जाऊन आपल्या मागे घरच्यांना त्रास नको म्हणून पुरणमल मेहेरासारखे काही जण मुला बाळांना संपवून स्वतः आत्महत्या करतात. ज्या निष्पाप जीवांचे या सुंदर दुनियेत नुकतेच आगमन झाले आहे त्यांना संपवण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? त्यांना मारताना आपल्या काळजाला भेगा कशा पडत नाहीत ?आपल्या कृत्यात त्या निष्पापांचा अपराध तो काय ?दुर्धरआजाराने कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांनी हे भोग आपल्याच पदरी का पडले आहेत, आपली कर्मे या सर्वाला कारणीभूत आहेत का ? दुर्धर आजाराने ग्रस्त सर्वच जण आत्महत्या करतात का, हा विचार कधी केला आहे का ? कोणत्याही संकटावर आत्महत्या हा उपाय असूच शकत नाही. घरातील एकाच्या आत्महत्येमुळे सारे कुटुंब विस्कळीत होते. आत्महत्या तेच करतात ज्यांचे मन कमकुवत आहे. आत्महत्या हे मानसिक आजाराचे टोकाचे लक्षण आहे. आजमितीला भारतात ज्या प्रमाणात शारिरीक आजाराविषयी जागरूकता आहे त्या तुलनेत कितीतरी पटीने मानसिक आजाराविषयी गैरसमज आहेत. प्रत्येकाला जसा शारीरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; मात्र 'मानसोपचार तज्ज्ञाकडे केवळ वेडेच जातात आणि आपल्याला काही वेड लागलेले नाही' असा फार मोठा गैरसमज भारतीयांत पसरला आहे, परिणामी सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात. आत्महत्या करणाऱ्यांच्याप्रति समाज सहानुभूती दाखवत असला तरी भारतीय संविधानानुसार तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. आत्महत्या केली म्हणजे सुटका होईल या विचाराने आत्महत्या करणारा हे धाडस करतो, मात्र ही खऱ्या अर्थाने सुटका नसतेच असे अध्यात्म सांगते. अध्यात्मानुसार मानवासह प्रत्येक प्राणीमात्राच्या जन्म हा प्रारब्धभोग भोगून संपवण्यासाठी झालेला असतो. त्यामुळे जन्म आणि मृत्यू हे विधिलिखित असते. त्यामध्ये ढवळाढवळ करून स्वतःहून मृत्यू ओढवून घेतल्यास पृथ्वी लोकातील समस्यांपासून सुटका मिळेल; मात्र विधात्याच्या नियोजनात हस्तक्षेप केल्यामुळे आत्महत्या करणाऱ्याचा आत्मा पुढील अनेक वर्षे भुवलोकात हालअपेष्टा सहन करत तडफडत असतो. त्या सहन करून संपवल्याशिवाय त्याला पुढच्या योनीमध्ये जन्म मिळत नाही. ८४ लक्ष योनीचा फेरा पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या मनुष्य जन्माचे सार्थक करणे विधात्याला अपेक्षित असते; मात्र स्वतःच्या कर्मदरिद्रीपणाने आत्महत्येसारखी पळवाट स्वीकारणाऱ्याची मृत्यूनंतरही सुटका नसते. त्यामुळे आत्महत्या करून सूटका होते हा केवळ गैरसमज आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**






आज २० ऑगस्ट. भारताचे माजी पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे राजीव गांधी यांची जयंती. आधुनिक विचार, विज्ञान-तंत्रज्ञानावरील विश्वास आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे राजीव गांधी यांनी भारताच्या विकासाला नवी दिशा दिली. म्हणूनच त्यांना भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्रांतीचे प्रमुख शिल्पकार मानले जाते.

२० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वांत तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४०व्या वर्षी त्यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र असूनही राजीव गांधी यांना सुरुवातीला राजकारणात विशेष रस नव्हता. त्यांची खरी आवड विज्ञान, तंत्रज्ञान आणि विमानउड्डाणात होती. त्यांनी व्यावसायिक वैमानिक म्हणून इंडियन एअरलाइन्समध्ये काम केले.

भाऊ संजय गांधी यांच्या १९८० मधील निधनानंतर राजीव गांधी राजकारणात आले. अमेठी लोकसभा मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवून विजय मिळवला. १९८२ मध्ये दिल्लीत झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर देशासमोर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या आणि राजीव गांधींच्या नेतृत्वाला अभूतपूर्व जनादेश मिळाला. पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भारताला संगणक, दूरसंचार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगाकडे नेण्याची त्यांची दूरदृष्टी. २१वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक असेल या विचाराने त्यांनी देशात संगणकीकरण आणि दूरसंचाराच्या विस्ताराला चालना दिली. त्या काळात संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मोठा विरोध आणि संभ्रम असतानाही त्यांनी भविष्यातील भारताची गरज ओळखली. सॅम पित्रोदा यांच्यासारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने दूरसंचार क्षेत्राच्या आधुनिकीकरणाला गती मिळाली.

राजीव गांधींच्या काळात शिक्षण क्षेत्रालाही नवी दिशा मिळाली. १९८६चे राष्ट्रीय शिक्षण धोरण, जवाहर नवोदय विद्यालयांची संकल्पना, उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर यामुळे शिक्षणव्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडले. पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यासाठी ६४वे आणि ६५वे घटनादुरुस्ती विधेयक त्यांच्या सरकारने मांडले. ही विधेयके त्या वेळी मंजूर झाली नाहीत; मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक बळ देण्याचा पाया पुढे ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तीमुळे मजबूत झाला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागासाठीही नवे दालन खुले झाले. राजीव गांधींच्या कारकिर्दीत काही निर्णयांवर तीव्र मतभेदही झाले आणि त्यांच्या सरकारला अनेक राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना उपलब्धींसोबत मर्यादा आणि वादग्रस्त निर्णयांचाही वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे.

२१ मे १९९१ रोजी तमिळनाडूतील श्रीपेरुंबुदूर येथे लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम या श्रीलंकेतील दहशतवादी संघटनेशी संबंधित आत्मघाती हल्ल्यात राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यांच्या स्मरणार्थ २१ मे हा दिवस भारतात दहशतवादविरोधी दिवस म्हणून पाळला जातो.

राजीव गांधी यांनी भारताला तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची दिशा दाखवली. संगणक आणि दूरसंचार हे केवळ भविष्यातील साधन नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचे आधारस्तंभ ठरू शकतात, हे त्यांनी त्या काळात ओळखले. आज भारत माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि दूरसंचार क्षेत्रात जगातील महत्त्वाच्या देशांमध्ये उभा आहे, त्यामागील पायाभरणीत राजीव गांधींच्या धोरणांचा निश्चितच मोठा वाटा आहे. आधुनिक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या या दूरदृष्टीच्या पंतप्रधानाला त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

### पडघम

जय जयकार नावां
वाजूलागले पडघम
चेले आपले पेरलेले
करतराहती धमधम

भोवताली कार्यकर्ते
मातवी सारखेउधम
त्यांच्यामुळेचं पुढारी
प्रकाशांत ये एकदम

साहेबांच्या कौतुकां
वाढतचाललायं भ्रम
न केलेल्या कामांचा
अधिक असा संभ्रम

कार्यकर्ता निष्ठावान
पाळतो इमान धरम
पडेलं ती कामे करी
कसलीचं नसे शरम

सभे आधी नेत्यांच्या
वातावरण करे गरम
प्रश्न होतात बोथट रे
टिकाकरपडती नरम

यशस्वी करतो सभा
भरगच्च भरू कोरम
सोंगट्या अचूक मांडे
कौशल्ये खेळा कॅरम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## बिलोंगिंग - अ जर्नी ऑफ लव्ह या आत्मचरित्रातून सोनिया गांधींच्या जीवनाचे पैलू उलगडणार

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र लवकरच अमेरिकेत प्रकाशित केले जाणार असल्याचे वृत्त आहे. या आत्मचरित्रामध्ये सोनिया गांधींच्या आयुष्यातील चढउतारांबद्दल खुलासे केले जाणार आहेत.

नेहरू-गांधी राजकीय कुटुंबामध्ये विवाह झाल्यानंतर ज्या आव्हानांचा सामना त्यांना करावा लागला, त्यावरही प्रकाश टाकला जाणार आहे. बिलोंगिंग - अ जर्नी ऑफ लव्ह असे या आत्मचरित्राचे नाव असून न्यूयॉर्कस्थित लेखक अल्फ्रेड नॉफ यांनी या चरित्राचे लेखन केले आहे. दिनांक १० नोव्हेंबर रोजी हे आत्मचरित्र प्रकाशित होणार आहे सोनिया गांधी या मूळच्या इटलीच्या असून त्या १९६० मध्ये इंग्लंडमधील केंब्रिजमध्ये शिक्षण घेत असताना त्यांची भेट राजीव गांधी यांच्याशी झाली, इटली सारख्या छोट्या शहरातून सुरु झालेला प्रवास भारताच्या अत्यंत प्रभावी राजकीय घराण्याची सून ते पुढे काँग्रेस अध्यक्षा इंदिरा गांधी यांची हत्या तसेच पती राजीव गांधी यांचा राजकीय प्रवास, नंतर त्यांचीही झालेली हत्या, सोनिया यांचा राजकारणातील प्रवेश आणि दीर्घकाळापर्यंत काँग्रेसचे अध्यक्षपदाची कारकिर्द या सर्व घटनांबाबत या आत्मचरित्रामध्ये सोनिया गांधींनी आपली भूमिका मांडली आहे.

शेवटी अध्यक्षपद सोडणे आणि पंतप्रधानपद नाकारण्याच्या निर्णयामागील भूमिकेहीचाही त्यामध्ये समावेश असणार आहे.

भारतातील गेल्या सहा दशकांतील सामाजिक आणि राजकीय बदलांचा जवळून घेतलेला मागोवा यातून पाहायला मिळणार आहे एकूणचं इटली ते भारत प्रवासाचे वर्णन यातून पहायला मिळणार आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# ‘श्री राधाकृष्ण सेवा मंडळा’च्या ४४ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय सांगता

## वृंदावनचे प्रख्यात भागवताचार्य श्री निरंजन भाईजी महाराज यांच्या अमृतवाणीने हजारो भाविक मंत्रमुग्ध

**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.१९, दापोली (रत्नागिरी) :** समुद्राच्या अथांग लाटांचा गाभारा आणि ‘ज्ञानबा-तुकाराम’ या पावन मंत्राचा जयघोष... रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्याचे प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या उटंबर-कोळीवाडा येथे भक्तीचा एक सुवर्णकाळ नुकताच संपन्न झाला. येथील ‘श्री राधाकृष्ण सेवा मंडळातर्फे’ आयोजित करण्यात आलेला भव्य ‘४४ वा अखंड हरिनाम सप्ताह आणि कीर्तन महोत्सव’ अत्यंत श्रद्धा, अभूतपूर्व उत्साह आणि मंगलमय वातावरणात पार पडला. सोमवार, १० ऑगस्ट ते सोमवार, १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत चाललेल्या या ज्ञानयज्ञामुळे संपूर्ण उटंबर नगरी सात दिवस जणू प्रतिपंढरपूर झाली होती.

पूर्वजांच्या पवित्र पुण्याईने, ह.भ.प. पांडुरंग महाराज थळे व ह.भ.प. धोंडू महाराज कोल्हटकर यांच्या दैवी कृपाशीर्वादाने आणि ह.भ.प. दत्ता महाराज कोल्हटकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे अत्यंत नेटके आणि शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते.

***भव्य पालखी सोहळ्याने फुलेले भक्तीचे रंग***

महोत्सवाचा प्रारंभ १० ऑगस्ट रोजी अत्यंत भावपूर्ण वातावरणात ध्वजारोहणाने झाला होता. त्यानंतर जेव्हा टाळ-मृदंगाचा कडकडाट आणि विठूनामाच्या गजरात माउलींची भव्य पालखी मिरवणूक निघाली, तेव्हा अवघे उटंबर गाव डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या माता-भगिनी आणि हरिनामाच्या रंगात न्हालेल्या तरुणांच्या उत्साहाने दुमदुमून गेले होते.



***‘माउली चरित्र कथेची’ अखंड अमृतगंगा***

यंदाच्या सप्ताहाचे मुख्य आकर्षण म्हणजे दुपारच्या सत्रात (दुपारी ३ ते ६) वृंदावन येथील सुप्रसिद्ध ज्ञानसंपन्न भागवताचार्य पूज्य श्री निरंजन भाईजी महाराज शिंदे यांच्या मधुर वाणीतून पाझरलेली ‘संगीतमय श्री संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा’ हे होते.

माउलींचा पूर्वजांचा इतिहास, पैठण गमन, अलौकिक तीर्थयात्रा आणि हृदयस्पर्शी समाधी सोहळा या प्रसंगांचे त्यांनी केलेले रसाळ निरूपण भाविकांच्या थेट हृदयाला भिडले. १६ ऑगस्ट रोजी या पवित्र कथेची पूर्ण आहुती देण्यात आली. या ज्ञानयज्ञाचा लाभ घेण्यासाठी दररोज परिसरातून भाविकांची अलोट गर्दी उसळली होती.

***अखंड साधना आणि धार्मिक कार्यक्रमांची मांदियाळी***

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ५ वाजल्यापासून (काकड आरती), सकाळी ‘श्री ज्ञानेश्वरी पारायण’, सायंकाळी हरिपाठ व ’शिवलीला अमृत ग्रंथ’ वाचन आणि रात्री महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांचे हरि कीर्तन पार पडले. तर रात्री उशिरा ‘श्री राधाकृष्ण महिला व पुरुष सेवा मंडळाचा’ संयुक्त रात्रजागर या सोहळ्याच्या पारंपरिक वैभवाला उजळून गेला.

***नागपंचमीला ‘काल्याचे कीर्तन’ आणि भव्य ‘लकी ड्रॉ’ने सुवर्ण सांगता***

सोमवार, १७ ऑगस्ट रोजी नागपंचमीच्या पावन मुहूर्तावर या महोत्सवाची सांगता झाली. सकाळी १० ते १२ या वेळेत रायगड भूषण ह.भ.प. डॉ. मारुती महाराज कोल्हटकर यांच्या सुश्राव्य वाणीतून ’काल्याचे कीर्तन’ संपन्न झाले आणि भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. नागपंचमीचे औचित्य साधून सोमवारी रात्री ठीक ९ वाजता ग्रामस्थांसाठी भव्य ’लकी ड्रॉ’ सोडण्यात आला, ज्याला उदंड प्रतिसाद मिळाला. याच सोहळ्यात उटंबर गावातील चिमुरड्यांच्या व तरुणांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. तसेच मंदिरासाठी अहोरात्र झटणाऱ्या ’कामे वाटप ग्रुप’मधील सेवाभावी सदस्यांचा कृतज्ञता सत्कार करण्यात आला.

***सेवा मंडळाकडून भाविकांचे व ग्रामस्थांचे आभार***

हा ४४ वा अखंड हरिनाम सप्ताह ऐतिहासिकदृष्ट्या यशस्वी करण्यासाठी ’श्री राधाकृष्ण सेवा मंडळ,’उटंबर’च्या सर्व सदस्यांनी, स्वयंसेवकांनी अहोरात्र अथक परिश्रम घेतले. सोहळा अत्यंत शांततेत आणि शिस्तीत पार पाडल्याबद्दल व्यवस्थापनाच्या वतीने उटंबर परिसरातील तमाम भाविक जनता, देणगीदार आणि प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# सोयगावच्या जि.प प्रशालेतील शिक्षकांची रिक्त पदे भरा नगरसेविका कुसुम दुतोंडे यांची मागणी

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१९, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव जि.प. प्रशालेत एकूण मंजूर शिक्षकांपैकी १० पदे रिक्त आहे. यात माध्यमिकचे सात पैकी केवळ तीनच कार्यरत असून चार पदे रिक्त आहे गणित आणि इंग्रजी या दोन्ही मुख्य विषयाला शिक्षकच नसल्याने नववी व दहावीच्या विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्यात यावी या मागणीचे निवेदन सोयगाव नगर पंचायत च्या नगरसेविका तथा महिला व बाल कल्याण सभापती कुसुम दुतोंडे यांनी गटविकास अधिकारी यांना दिले असून आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

सोयगाव येथील जि प प्रशालेत ४९० विद्यार्थी आहे. विद्यार्थी संख्या चांगली आहे.परंतु सध्या शाळेत मुख्याध्यापक १ माध्यमिक शिक्षक ४ प्राथमिक शिक्षक १ लिपिक १परिचर ३अशी एकूण १० पदे रिक्त असून शालेय कामकाजावर परिणाम होऊन गुणवत्तेवर याचा परिणाम होत आहे महत्वाचे विषय शिकवायला माध्यमिक शिक्षक नाहीत.

मोठ्या प्रमाणावर मुलींची संख्या अधिक आहे यामुळे बाहेर ठिकाणी मुलींचे शिक्षण न घेता स्थानिक जिल्हा परिषद शाळेला प्राधान्य दिले आता पालक वर्गात रिक्त पदांमुळे खूप नाराजी आहे.जर रिक्त पदे अशीच राहिली तर मुलींचे व मुलांचे शिक्षण अडसर होणार असून विद्यार्थी शैक्षणिक नुकसान होत आहे.तरी विद्यार्थी शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक असे आवश्यक ६ व शिक्षकेतर आवश्यक पदे ४ अशी रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याची मागणी सोयगाव नगर पंचायत च्या नगरसेविका तथा महिला व बाल कल्याण सभापती कुसुम राजू दुतोंडे यांनी गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्या कडे आज दि १९ रोजी लेखी निवेदन दिले यात लवकरच ही रिक्त पदे न भरल्यास तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला आहे.

इतर तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या जि.प. शाळेत विद्यार्थी नसल्याने शाळा बंद पडत आहे परंतु सोयगाव च्या जि प प्रशालेत विद्यार्थी संख्या चांगली आहे त्यात मुलींची संख्या जास्त आहे. खाजगी शाळेत फी भरून शिकविण्याची पालकांची क्षमता नाही त्यामुळे जि प शाळेत सर्वसामान्य गोर गरिबांची मुलं शिक्षण घेत आहे परंतु गणित आणि इंग्रजी सारख्या मुख्य विषयाचे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे लवकर रिक्त पदे न भरल्यास आंदोलन केले जाईल असे नगरसेविका कुसुम दुतोंडे यांनी सांगितले.

# भानेगावचे माजी उपसरपंच विपीन नाईक यांचा वाढदिवस साजरा; आ. डॉ.देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** आमदार डॉ.आशिष देशमुख यांचे खंदे समर्थक व भानेगाव ग्राम पंचायतीचे माजी उपसरपंच विपीन नाईक यांचा ४२ वा वाढदिवस दिनांक१८ ऑगस्ट नवीन बिना भानेगाव येथे मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. विपीन नाईक मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या सोहळ्याला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह कार्यकर्त्यांचा प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

कार्यक्रमाला आमदार डॉ. आशिष देशमुख तसेच जवाहरलाल नेहरू ॲल्युमिनियम रिसर्च सेंटरचे सेवानिवृत्त संचालक डॉ.अनुपम अग्निहोत्री यांनी विशेष उपस्थिती लावून विपीन नाईक यांना भावी आयुष्यासाठी आणि राजकीय-सामाजिक वाटचालीस उदंड शुभेच्छा दिल्या. विपीन नाईक यांनी भानेगाव ग्राम



पंचायतीचे उपसरपंच पदावर कार्यरत असतांना भानेगाव परिसरात अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे मार्गी लावली २००९ पासून विपीन नाईक आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत सहकारी म्हणून कार्यरत आहेत. आमदार देशमुखांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी परिसरातील दीन-दलित, गरीब व गरजू घटकांची निरंतर सेवा केली आहे. जनसेवेच्या या व्रतस्थ भूमिकेमुळेच भानेगाव व परिसरात त्यांचा मोठा जनसंपर्क आणि मोठा चाहता वर्ग निर्माण झाला आहे.या सोहळ्याप्रसंगी वरिष्ठ भाजप नेते रमेश जैन, भानेगावच्या सरपंच शालिनी चवरे, उपसरपंच सोनू बागडे, ग्रा.पं. सदस्य पुष्पा जालंदर, दर्शना बोरकर, अश्विनी अभ्यंकर, कमलेश भास्कर यांच्यासह शामराव सरोदे, नितीन गोस्वामी, डोमाजी निखाडे, क्रिष्णा चिकनकर, विशाल नाईक, योगेश जालंदर, स्वप्नील खडसे, राहुल चचाने, गंगाधर वारकर, अरविंद चिकनकर, बालू पाठराबे, प्रणय कुंभारे यांच्यासह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन व आभार सुनील जालंदर यांनी मानले.

> विपीन नाईक हे केवळ माझे खंदे समर्थक नसून, तळागाळातील सामान्य माणसाचे प्रश्न सोडवणारे एक अभ्यासू आणि निष्ठावंत लोकप्रतिनिधी आहेत. २००९ पासून त्यांनी माझ्यासोबत अत्यंत निष्ठेने कार्य करत दीन-दुबळ्यांची आणि गरिबांची सेवा केली आहे भानेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच असताना त्यांनी राबवलेली विकासकामे आजही कौतुकास्पद आहेत जनतेशी थेट नाळ जोडलेला असा हा अभ्यासू आणि कार्यक्षम पाठीराखा आहे. त्यांना उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य आणि भावी यशस्वी सामाजिक-राजकीय प्रवासासाठी माझ्या मनापासून हार्दिक शुभेच्छा!
>
> **- आमदार डॉ.आशिष देशमुख (सावनेर कळमेश्वर विधानसभा)**

# पालशेत बाजारपेठेतील रस्त्याची दयनीय अवस्था, जीवघेण्या खड्ड्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१९, गुहागर (पालशेत) :** गुहागर तालुक्यातील पालशेत बाजारपेठेतील मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना आणि वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बाजारपेठेच्या मध्यभागी, दिपक शिरगांवकर यांच्या किराणा दुकानाजवळ एक प्रचंड आणि जीवघेणा खड्डा निर्माण झाला आहे.

सध्या पावसामुळे या खड्ड्यात चिखल आणि पाणी साचले असून एसटी तसेच खाजगी वाहनधारकांना मार्गस्थ होताना फार मोठी कसरत करावी लागत आहे. सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे या गंभीर समस्येकडे स्थानिक प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. डोळ्यासमोर धोका



असतानाही कोणीही आवाज उठवत नाही, असा येथील नागरिक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. जनतेच्या जीवाशी खेळ थांबवून पालशेत ग्रामपंचायत आणि शासन प्रशासनाने या रस्त्याच्या आणि खड्ड्यांच्या भीषण समस्येची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक, दुकानदार, व्यापारी वर्ग करत आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालशेत बाजारपेठेतील खड्डेमय झालेला रस्ता संबंधित बांधकाम विभागाने तात्काळ दुरुस्ती करून येथील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

**नागरिकांच्या प्रतिक्रिया :**

पालशेत बाजारपेठेतील हा रस्ता आणि मोठे खड्डे नागरिकांसाठी गंभीर धोका बनले आहेत. प्रशासनाने दुर्घटना होण्याची वाट न पाहता तात्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी. संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने याबत त्वरित कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**- अवधुत पाडावे (पालशेत)**

---

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, या गंभीर परिस्थितीकडे ना तिथले स्थानिक लोक लक्ष देत आहेत, ना दुकानदार. सर्वांच्या डोळ्यासमोर हा प्रकार सुरू आहे पण कुणीही काही बोलत नाही. जनतेच्या जीवाशी चाललेला हा खेळ आणि या रस्त्याच्या भीषण समस्येची दखल आता स्थानिक प्रशासन आणि पालशेत ग्रामपंचायतीने तात्काळ घ्यावी.

**- विजय शंकर झिंबर (पालशेत)**

# थोडक्यात बातम्या

## घोणसी येथे उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन



**अक्षराज : जयम देमगुंडे**

**दि.१९, उदगीर (लातुर) :** उदगीर अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करून वंचित घटकांना न्याय मिळावा, या मागणीसाठी घोणसी तज्ञ येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत शासनाच्या भूमिकेविरोधात घोषणाबाजी केली.

उपवर्गीकरणामुळे आरक्षणाचा लाभ सर्वाधिक गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. शासनाने उपवर्गीकरणाच्या मागणीबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

रास्ता रोकोमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. प्रशासन व पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. आंदोलन शांततेत पार पडले.

उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी राज्यातील विविध भागांत आंदोलन होत असून घोणसी येथील आंदोलनातूनही शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

## क्रांतिज्योती यात्रेचे दहेगाव (रंगारी) येथे उत्साहात स्वागत



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** मोझरी येथील गुरुकुंज आश्रम (अमरावती) येथून ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी निघालेली ‘क्रांतिज्योती यात्रा’ विदर्भभरात जनजागृती करत दहेगाव (रंगारी) येथे पोहोचली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामसुधारणा आणि स्वच्छतेचे दिलेले विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे. आपले गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवल्यास आपले कुटुंबही निरोगी राहील असा संदेश या यात्रेच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

दहेगाव (रंगारी) येथील पुंडलिक चौधरी यांचे जावई कै. प्रकाश ठाकरे यांच्या निधनानिमित्त त्यांच्या निवासस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पादुकांची पालकी ठेवून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर ही यात्रा कोराडी मंदिराच्या दिशेने पुढील प्रवासासाठी रवाना झाली.

या प्रसंगी गुरुकुंज आश्रमातून आलेले बाबाराव पाटील, डॉ. धनेश्वर मुंडे, राजेंद्र गाडगे, नीलकंठ क्रमे गुरुजी, अभिदादा राऊत, बाबा राऊत देवतारे, भास्कर पिंपरे, दिगंबर पांडे, वेदांत पांडे, मोहनदास सपाटे, सुनील बर्गी, प्रकाशराव भालेराव, प्रकाश चौधरी, गंगाधर मोहल्ले, दुरेशराव चौधरी, गंगाधर दौडके, बलवंतराव ठाकरे, सुरेशजी, करण माजरे, मुकेशजी काकडे, कामराजी ढेंगरे, विजयराव फुटे, पंकज चौधरी यांच्यासह अनेक गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चंद्रपूर जिल्ह्यातील २०३ शाळांमधील ७५ हजार विद्यार्थ्यांनी घेतली अंमली पदार्थ विरोधी शपथ...




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** युवा पिढीला व्यसनाधीनतेच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि सुरक्षित, निरोगी समाज घडविण्यासाठी चंद्रपूर पोलीस दलाच्या वतीने नशामुक्त युवा भारत अभियान’ अंतर्गत जिल्ह्यात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत जिल्ह्यातील तब्बल २०३ शाळा व महाविद्यालयातील ७५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी ‘से नो टू ड्रग्स्’ (अमली पदार्थांना नकार) ची सामूहिक शपथ घेऊन नशामुक्त भारताचा निर्धार व्यक्त केला.

विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थाच्या घातक परिणामांविषयी जाणिव निर्माण करणे आणि त्यांना व्यसनांपासून दूर ठेवणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये आयोजित या कार्यक्रमाला प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, पोलीस अधिकारी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. सरदार पटेल महाविद्यालयात विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांचा शपथविधी पार पडला. बी. जे. एम. कॉर्मेल अकॅडमी, येथे चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत आणि पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी प्रत्यक्ष उपस्थ्त राहून विद्यार्थ्यांना अमली पदार्थाचे दुष्परिणाम समजावून सांगत नशामुक्त राहण्याची शपथ दिली. तसेच शिवाजी हायस्कूल, राजुरा येथे राजूरा विधानसभा क्षेत्राचे आ. देवराव भोंगळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला. खत्री कॉलेज, चंद्रपूर येथेही उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संकल्प केला. या मोहिमेत केवळ विद्यार्थीच नव्हे, तर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी( नगराध्यक्ष, नगरसेवक, सरपंच) आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्व स्तरातील सहभागामुळे या अभियानाला एका जनआंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले.

’ नशामुक्त युवा, सशक्त भारत’ या संकल्पनेला पाठिंबा देत विद्यार्थ्यांनी स्वत: अमली पदार्थाचे सेवन न करण्याचे तसेच आपल्या मित्रांमध्ये व समाजात याविरोधात जनजागृती करण्याचे वचन दिले. चंद्रपूर पोलीस दलाने स्पष्ट केले आहे कि, जिल्ह्यातील तरुणांना अमली पदार्थाच्या जाळ्यातून सुरक्षित ठेवण्यासाठी भविष्यातही अशाप्रकारचे जनजागृतीपर, प्रतिबंधात्मक व शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवले जातील.